(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता सैनिक दल

**डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे** सहा. प्राध्यापक बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी. जि. सांगली. मो. नं. 9921297780.

E-mail - dattatrayakharade@gmail.com

---

विसाव्या शतकात रूढीप्रिय, परंपराप्रिय आणि सनातनी विचारधारांशी ज्यांनी तीव्र संघर्ष केला आणि आपल्या देशाच्या इतिहासात क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणले असे थोर समाजसुधारक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. त्यांनी महात्मा फुले यांच्यापासून प्रेरणा घेऊन प्रस्थापित समाजातील विषमतेविरूध्द प्रखर संघर्ष केला. समाजाच्या स्वाभाविक प्रगतीला सर्वात मोठा अडथळा विषमतेमुळे होत असतो. ती नष्ट केल्याशिवाय सामाजिक समता निर्माण होणे अशक्य आहे, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले आणि त्यानुसार त्यांनी पावले उचलली. डॉ. आंबेडकर जन्माला आले त्या काळात देशातील समाजात अस्पृश्यता, जातीयता, विषमता व अंधश्रध्दा यासारख्या अनिष्ट प्रथा प्रचलित होत्या. समाजात ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व होते. समाजात असलेल्या अनेक जातीपैकी महार, मांग व चांभार ह्या जाती अस्पृश्य म्हणून गणलेल्या होत्या. या जातीतील लोकांना अस्पृश्य म्हणूनच वागविले जात असे. त्यांच्या स्पर्शामुळे उच्चवर्णीय लोकांना विटाळ होतो अशी पक्की समजुत रूढ असल्याने उच्चवर्णीय लोक अस्पृश्यतेच्या नावाखाली दलितांना अत्यंत अपमानास्पद वागणूक देत असत. सार्वजनिक आड, विहीर, पाणवठे आणि तलावावरील पाणी घेण्याचा अधिकार दलितांना नव्हता. सामाजिक दृष्टया हे बहिष्कृत होते. त्यांच्या स्पर्शाने विटाळ होऊ नये म्हणून त्यांची वस्ती गावकुसाच्या बाहेर ठेवलेली असे. न्हावी लोक जनावराचे केस कापत असत परंतु ते दलितांचे केस कापत नसत. स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेचे चटके सहन केले होते. त्यामुळेच त्यांनी समाजपरिवर्तन आणि दलितांच्या उध्दारासाठी आयुष्यभर लढा दिला आणि त्यामध्ये ते यशस्वी झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा लढा हा समाजातील उच्चवर्गीय सनातनी विचाराच्या मनोवृत्ती विरूध्द होता. कॉंग्रेस व मुस्लिम लीग हे आंबेडकराचे विरोधक म्हणून वावरत होते. हा लढा शासकीय आणि अशासकीय प्रस्थापिताच्या विरोधात होता. महार, मांग आणि चांभार या जातीचा समावेश दलित जातीत केला जात होता. म्हणजेच सामाजिक आणि धार्मिक दृष्टीकोनातुन बहिष्कृत आर्थिकदृष्टया उपेक्षित व शोषित आणि पीडित असलेल्या जातीचा समावेश दलित या संज्ञेत केला जात होता. हा वर्ग मुलभूत गरजापासून वंचित होता. त्याच्या या स्थितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी स्वाभिमान निर्माण करण्यासाठी आणि आत्मविश्वास जागृत करण्यासाठी संघटित करणे आवश्यक होते. त्यासाठी डॉ. आंबेडकरानी ‘ बहिष्कृत हितकारिणी सभा ’ स्थापन करून बहिष्कृत समाजात शिक्षणाचा प्रसार केला. तसेच डॉ. आंबेडकरांनी दलितांमध्ये जागृत करण्यासाठी संघटित होण्याची गरज आहे. हे ओळखून माणगाव परिषदेच्या माध्यमातून राजकीय हक्कासाठी अनुकूल वातावरण तयार केले. आणि 19 मार्च 1927 रोजी महाड येथे स्वयंस्फूर्तपणे ‘समता सैनिक दलाची’ स्थापना करण्यात आली. यावेळी अध्यक्ष- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, उपाध्यक्ष - दे. वि. नाईक, डॉ. भाईदरकर, सभासद, भा. वि. प्रधान, द. वि. प्रधान, रा. दा. कंबळी, एस. एस. गुप्ते हे होते.[1]

सर्व माणसे समान आहेत. माणसाच्या विकासासाठी आवश्यक असणाया साधनावर व संधीवर प्रत्येक माणसाचे समान हक्क आहेत. सामाजिक समतेच्या तत्वावर या संस्थेचा विश्वास होता. नीतीच्या भक्कम पायावर समाजाची उभारणी करावयाची असेल तर समाजाच्या प्रत्येक घटकाला धार्मिक, सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात समतेची तत्वे लागु करणे आवश्यक आहे अशी या संस्थेची धारणा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समता सैनिक दलाबाबत म्हणतात. ‘‘ समाजात माणुसकीने जगता येत नाही, नैसर्गिक हक्कांचा येथे समतेने उपभोग होता येत नाही. ज्या धर्मांवर विषमतेचा कीट चढला आहे तो धर्म झुगारून देऊन खरी माणुसकी जपणारा धर्म निर्माण करण्याकरिता जे कार्य करावे लागत आहे, त्या पवित्र आणि उज्ज्वल कार्यासाठी या दलाची स्थापना करण्यात आलेली आहे.’’[2]

समता सैनिक दलाची गरज सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ‘‘ दुसरे असे की या शहरात पुष्कळ गुंड व बदमाश लोक दबा धरून आहेत. त्याच्या पासून संरक्षण करण्याकरिता तुम्ही चाळी चाळीतून प्रत्येक मोहोल्यातून संरक्षक दले तयार करा आणि संघटनेने रहा’’[3]

समता सैनिक दलाचे उद्देश -

1. गावगुंडापासून अस्पृश्यांचे संरक्षण करणे.
2. विषमतेच्या शिकवणुकीला आळा घालणे.
3. खरी माणुसकी जपणारा धर्म निर्माण करणे.
4. चवदार तळे व नाशिकच्या सत्याग्रहा सारखे लढे यशस्वी करणे.
5. समाजात खरी समता प्रस्थापित करणे.
6. स्वातंत्र्य व समता या पायावर नवीन समाजाची उभारणी करणे यासाठी अस्पृश्य समाजाची एकजुट करणे.[4]

समता सैनिक दलाची एखादी व्यक्ति सभासद झाल्यानंतर त्याला प्रतिज्ञा घ्यावी लागत असे- '' मी समता सैनिक दलाची प्रतिज्ञा करतो की, मी माझ्या जमातीवर होणारा जुलूम तिची पिळवणूक व तिची गुलामगिरी ही सर्व नष्ट करणाऱ्या पवित्र व उदात्त कार्यात अत्यंत निकराने लढेन, माझ्या वर्गाच्या व जमातीच्या लोकांच्या न्याय व माणुसकीचे हक्क संरक्षक करणाच्या कामी समता सैनिक दलाच्या सर्व आज्ञांचे मी पालन करीन, माझ्या कमजोरीमुळे माझ्याकडून या शपथेचा भंग झाल्यास दलाने फर्माविलेली शिक्षा भोगण्यास मी तयार आहे''[5]

समता सैनिक दलाच्या सैनिकाला शारिरीक, बौध्दिक व लष्करी शिक्षण देण्यात येत असे, हे शिक्षण कॅंपशाळा, क्लबवर्ग, व्याख्याने, चर्चा, मंडळे, वाचनालय या ठिकाणी देण्यात येत असे. समता सैनिक दलाच्या सैनिकाला खाकी फुल पॅन्ट, कॅनवासचे ब्राऊन बुट, किंवा पठाणी चप्पल, मोजे, निळया रंगाची फोल्डिंग टोपी, छडी, काठी, शिट्टी असा गणवेश होता. समता सैनिक दलाच्या सैनिकांनी व अधिकाऱ्यांनी धुम्रपान, मद्यपान करू नये. अधिकाऱ्यांच्या आज्ञेचा भंग किंवा दुसरा कोणताही गुन्हा केला तर पहिल्या वेळेस ताकीद देण्यात येत असे, ताकीद दिल्यानंतर त्याने या गोष्टी सोडून दिल्या नाही तर त्याला युनिफॉर्म (गणवेश) घालण्यास बंदी घालण्यात येईल. त्याला दलातून कमी करण्यात येई एवढी शिस्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी या दलाला लावलेली होती.[6]

समता सैनिक दल डॉ. आंबेडकरांनी स्थापन केल्यानंतर स्वंयस्फूर्तीने लोक सैनिक दलात सामील झाले. प्रांत, जिल्हा, शहर आणि खेडयात सुध्दा यांच्या शाखा स्थापन झाल्या होत्या. या दलाचे कार्य पाहून सर्व स्तरातील लोक भारावून गेले व दलामध्ये सामील होऊ लागले होते. लोकमान्य टिळक यांचे पुत्र श्रीधरपंत टिळक ब्राह्मणेत्तर चळवळीतील नेते, कार्येकर्ते व पत्र संपादक यांच्या सहवासात वावरत न्यायाविषयी आवड, अन्याय विषयी चीड, समाजकार्या विषयी विलक्षण सहानुभूती त्यांना होती, त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे शाखा स्थापन करण्याचा मनोदय व्यक्त केला व पुढे 8 एप्रिल 1928 रोजी पुणे येथे गायकवाडवाडयात समता संघाची स्थापना केली. यावेळी डॉ. आंबेडकर म्हणाले, ''समता संघाच्या कार्यास जागा देऊन समतेच्या तत्वावर उचलून धरण्यात श्रीधरपंतानी मोठे धैर्य दाखविले आहे.''[7]

समता सैनिक दल ही बाबासाहेब आंबेडकराची लढाऊ संघटना होती. सन 1942 मध्ये समता सैनिक दलाची भारतीय स्तरावर कमिटी नियुक्त करण्यात आली, तसेच घटना समितीही बनविण्यात आली. घटना बनविण्यासाठी तीन वर्षे लागली. बाबासाहेब आंबेडकरांनी दादासाहेब गायकवाड यांना दलाच्या घटनेसंबंधी अनेक पत्रे लिहिली. अखेर दलाचे सचिव श्री. एम. एम. ससाळेकर यांनी अनेकांच्या सहाय्याने समता सैनिक दलाची घटना तयार केली आणि ती बाबासाहेबांनी मान्य केली.[8]

समता सैनिक दलाचा ध्येयवाद कालांतराने व्यापक झाला होता. मातंग, चर्मकार, मांग, भंगी या सर्वांना आंबेडकरी चळवळीत सामील करणे आवश्यक आहे असे वाटले पाहिजे, तसे उदार वर्तन आपले असले पाहिजे. भटके - विमुक्त, आदिवासी, स्त्रिया या समाजाला मोठा अन्यायग्रस्त गट आहे. अजून ही त्यांच्यापर्यत भौतिक विकास पोहचला नाही. त्याच्यावर अनेक अत्याचार होतात, अन्याय व अत्याचार कोणावरही होवो व कोठे ही होवो. तसे आपल्याच कुटुंबावर झाला असे समता सैनिक दलाला वाटले पाहिजे, हे समता सैनिक दलाचे विस्तारलेले स्वरूप आहे, ही जबाबदारी असे वागावे हा फार मोठा उदात्त हेतू डोळयासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलातील सैनिकांना करून दिला. अशा सर्व घटकांना एकत्रित करून चळवळ उभारली तर सामाजिक चळवळ तर यशस्वी होईलच शिवाय सामाजिक समता प्रस्थापित करण्यांचे ध्येय यशस्वी होईल असे डॉ. आंबेडकरांना वाटत होते.

समता सैनिक दलाची स्थापना झाल्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी दलाच्या सैनिकांना तत्वज्ञानाशी एकनिष्ठ राहिले पाहिजे यावर भर दिला, कारण डॉ. आंबेडकर हे समता सैनिक दलाला जन्म देणारे असल्यामुळे या सैनिकांनी आपल्या पित्याशी कृतज्ञ असायला पाहिजे. भारतात समता प्रस्थापित करणे हे कार्य डॉ. आंबेडकरांनी समता सैनिक दलावर सोपविले होते. सन 1956 मध्ये डॉ. बाबासाहेबांनी धम्म दीक्षा घेतली व समतेच्या प्रस्थापनेला एक पायाभूत तत्वज्ञानही दिले. हे तत्वज्ञान 'बुध्द आणि त्याचा धम्म' या ग्रंथात आहे. बुद्धाशी एकनिष्ठ राहिले पाहिजे. हे जगाला सांगण्याची जबाबदारी दलाने स्वतःची जबाबदारी मानली होती. बुध्दिवाद ही समता सैनिक दलाची विचार संहिता मानली जाते.[9] बुध्दिवाद म्हणजे सदसद्विवेक बुध्दिला जे पटेल तेच मानतो. जेवढे विज्ञान दृष्टीत बसते तेवढेच मानणे होय.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी देशातील दलितांवर अस्पृश्यतेच्या नावाखाली उच्चवर्णीयां कडून फार अपमानास्पद वागणुक दिली जात होती. त्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्याचा किंवा घेण्याचा अधिकार नव्हता. 4 ऑगस्ट 1923 रोजी ब्राह्मणेत्तर पक्षाचे नेते सी. के. बोले यांनी मुंबई प्रांताच्या विधीमंडळात एक ठराव पास करून घेतला. त्यानुसार सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालये व बगीचे इत्यादी ठिकाणी अस्पृश्यता बाळगू नये, या ठरावाची अंमलबजावणी करावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळयावर पाणी पिण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी परिषदेतील सर्व प्रतिनिधी तेथे जाऊन पाणी पिण्याचे ठरले. त्यानुसार 20 मार्च 1927 रोजी डॉ. आंबेडकर व समता सैनिक दलाचे कार्यकर्ते यांनी महाड येथील चवदार तळयाचे पाणी पिले. हा महाड सत्याग्रह म्हणून ओळखला जातो.

डॉ. आंबेडकरांनी महाड येथे भरलेल्या परिषदेत लोकविग्रही व माणुसकीचा उच्छेद करणाऱ्या मनुस्मृतीचे दहन करण्याचा निर्णय घेतला. 25 डिसेंबर 1927 रोजी मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. या कार्यात समता सैनिक दलाच्या सैनिकांनी जिवाची पर्वा न करता हा सत्याग्रह यशस्वी केला.

मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह झाले. अंबादेवी मंदिर सत्यागृह मंदिर प्रवेशाचा पहिला सत्याग्रह आहे. अमरावती येथे अंबादेवीचे प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुखांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह सुरू झाला. यात समता सैनिक दलाच्या सैनिकांनी भाग घेतला होता. पर्वती मंदिर सत्याग्रह पुणे येथे यशस्वी केला. तसेच काळाराम मंदिर सत्याग्रह नाशिक येथील 3 मार्च 1930 सत्याग्रहात समता सैनिक दलाच्या सैनिकांनी महत्वाची भूमिका बजावली होती.[10]

**निष्कर्ष :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समता सैनिक दलाने सर्व चळवळीत सक्रिय भाग घेतला होता. त्यांनी जातिभेद मोडण्याची चळवळ उभारली. समता प्रस्थापित करण्यासाठी सभासदांच्या घरी आळीपाळीने जेवण समारंभ व चर्चा करणे असे उपक्रम हाती घेतले होते. 'समता' नावाचे मासिक सुरू केले व याव्दारे दलाचे कार्य लोकांपर्यंत पोहचविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 15 ऑगस्ट 1936 रोजी 'स्वतंत्र मजूर पक्षांची' स्थापना केली यात अत्यंत महत्वाची कामगिरी समता सैनिक दलाने बजावलेली दिसते. शेडयुल कास्ट फेडरेशन व 1955 मध्ये 'भारतीय बौध्दजन समिती' स्थापन केली. याचे कामही समता सैनिक दलाने केलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या मृत्यु नंतर रिपब्लीकन पक्षाचे कार्य सुरू झाले. त्या पक्षामध्ये अनेक गट निर्माण झाले. त्यामुळे या सैनिक दलाला अवकळा आलेली दिसून येते. तरी आजही समता सैनिक दलाचे सैन्य कार्यरत असलेले दिसून येतात. उदा. 14 एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, धम्मचक्र परिवर्तन दिन, तसेच विविध धम्माच्या कार्यात तसेच 6 डिसेंबर डॉ. बाबासाहेबाचा महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी (मुंबई) व इतर भागात स्वंयसेवक म्हणून कार्य करताना दिसतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या हयातीत समता सैनिक दलाचे कार्य जे प्रभावी होते, ते आता प्रभावी नसलेले दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणानंतर शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या, आर. पी. आय. च्या नेत्यांनी रिपब्लिकन ऑफ इंडिया यांनी घटना संकलित करून पुर्नलिखित केली आणि ती प्रकाशित केली. परंतु समता सैनिक दलाच्या नेत्यांनी शेड्युल्ड कास्ट फेडरेशनशी, आर. पी. आय. शी संबंध तोडले. त्यामुळे समता सैनिक दलाच्या 1944 च्या घटनेनुसार कार्य थंडावले. त्यामुळे दलाचे अस्तित्व हळूहळू कमी झाले. आज समता सैनिक दलामध्ये मोठ्या प्रमाणात ज्याला पाहिजे त्याप्रमाणे नियम व ड्रेस कोड, झेंडे बनविले जात आहेत. आणि समाज कारणामध्ये राजकारणाप्रमाणे गट निर्माण केले जात आहेत. त्यामुळे आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळींना काही प्रमाणात अपयश येत आहे. म्हणून आता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काळात कार्यरत असलेले आणि त्यांनी आखून दिलेल्या मार्गाने चालणारे त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेबांना अपेक्षित असलेले आणि त्यांनी दिलेल्या शिस्त आणि घटनेनुसार चालणारे समता सैनिक दल निर्माण करणे हीच काळाची गरज आहे.

**संदर्भ :-**

1. मनोहर यशवंत - 'समता सैनिक दल', युग साक्षी प्रकाशन, नागपूर, 2005, पृष्ठ क्र. 17
2. डॉ. आंबेडकर बाबासाहेब - 'लेखन व भाषणे' खंड, 18 भाग 2 पृष्ठ क्र. 244.
3. कित्ता - पृष्ठ क्र. 391.
4. उपरोक्त - मनोहर यशवंत, पृष्ठ क्र. 39.
5. कित्ता - पृष्ठ क्र. 47.
6. कित्ता - पृष्ठ क्र. 52.
7. उपरोक्त - डॉ. आंबेडकर बाबासाहेब - 'लेखन व भाषणे' पृष्ठ क्र. 397.
8. कांबळे बी. सी. - 'समग्र आंबेडकर चरित्र', खंड 1 ते 14, सुगावा प्रकाशन, पुणे, 2006 पृष्ठ क्र. 52.
9. उपरोक्त - मनोहर यशवंत, समता सैनिक दल. पृष्ठ क्र. 63.
10. उपरोक्त - कांबळे बी.सी. 'समग्र आंबेडकर चरित्र', पृष्ठ क्र. 97.